जिल्हा परिषद रत्नागिरी
भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर भवन, दुसरा मजला,
माळनाका रत्नागिरी ४१५६१२

**शिक्षण विभाग (प्राथमिक)**

दूरध्वनी क्र. ०२३५२-२२२५७६ ई-मेल: - eoprirat5@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# NASA / ISRO भेट चाळणी परीक्षेची नियमावली, माहिती, नियोजन व FAQ

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>परीक्षेचा मुद्दा</th><th>करावयाची कार्यवाही</th></tr>
<tr><td>१</td><td>अंतिम वेळापत्रक</td><td>१) केंद्रस्तर -<br>बुधवार, ३० नोव्हेंबर २०२२<br>पेपरची वेळ- सकाळी ११.०० ते दुपारी १२.००<br><br>२) बीटस्तर-<br>गुरूवार , ८ डिसेंबर २०२२<br>पेपरची वेळ- सकाळी ११.०० ते दुपारी १२.००<br><br>३) तालुकास्तर -<br>रविवार, ११ डिसेंबर २०२२<br>पेपरची वेळ- सकाळी ११.०० ते दुपारी १२.००<br><br>४) जिल्हास्तर -<br>शनिवार व रविवार,१७ व १८ डिसेंबर २०२२<br>मुलाखत व सादरीकरण/प्रात्याक्षिक दोन दिवस<br>(तालुकानिहाय वेळापत्रक असेल)</td></tr>
<tr><td>२</td><td>सदर स्पर्धा परीक्षेला कोण बसणार?</td><td>फक्त रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या शाळांचे इयत्ता ५ वी ते ७ वीचे सर्व विद्यार्थी</td></tr>
<tr><td>३</td><td>परीक्षेचा दर्जा सर्वांना समान असणार का ?</td><td>हो. इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी समान पेपर असणार व काठिण्य पातळीही समानच असणार</td></tr>
<tr><td>४</td><td>परीक्षेचा अभ्यासक्रम</td><td>इयत्ता ५ वी ते ७ वीच्या अभ्यासक्रमातील विज्ञान विषयांशी संबंधित देण्यात आलेले ५० मुद्दे/ विषय</td></tr>
<tr><td>५</td><td>परीक्षा केंद्र</td><td>कोणतीही केंद्र शाळा/ केंद्रातील मोठी शाळा / माध्यमिक शाळा</td></tr>
<tr><td>६</td><td>एका केंद्रात किती परीक्षा केंद्र असू शकतात?</td><td>विद्यार्थी संख्येनुसार संबंधित तालुक्याच्या ग.शि.अ. यांनी निर्णय घ्यावा.</td></tr>
<tr><td>७</td><td>एका परीक्षा केंद्रात किती परीक्षा खोल्या असू शकतात?</td><td>आवश्यकतेनुसार/ उपलब्धतेनुसार</td></tr>
<tr><td>८</td><td>एका वर्गात किती मुले बसतील?</td><td>२४ किंवा ६ च्या पटीत</td></tr>
<tr><td>९</td><td>बैठक व्यवस्थेचे स्वरुप</td><td>बेंचवर किंवा जमिनीवर ZIG ZAG पध्दतीने बैठक व्यवस्था व कोडनिहाय प्रश्नपत्रिका वाटप खालीलप्रमाणे-
<table>
<tr><td>१- संच A</td><td>७- संच C</td><td>१३- संच A</td><td>१९- संच C</td></tr>
<tr><td>२- संच B</td><td>८- संच D</td><td>१४- संच B</td><td>२०- संच D</td></tr>
<tr><td>३- संच C</td><td>९- संच A</td><td>१५- संच C</td><td>२१- संच A</td></tr>
<tr><td>४- संच D</td><td>१०- संच B</td><td>१६- संच D</td><td>२२- संच B</td></tr>
<tr><td>५- संच A</td><td>११- संच C</td><td>१७- संच A</td><td>२३- संच C</td></tr>
<tr><td>६- संच B</td><td>१२- संच D</td><td>१८- संच B</td><td>२४- संच D</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>१०</td><td>विद्यार्थ्यांना या चाळणी परीक्षेसाठी वेगळे परीक्षा क्रमांक दिले जातील का ?</td><td>नाही. विद्यार्थ्यांचा शाळेतील हजेरी क्रमांक हाच विद्यार्थ्यांचा परीक्षा क्रमांक असेल.</td></tr>
<tr><td>११</td><td>बैठक व्यवस्था कशी असावी किंवा विद्यार्थ्यांनी इयत्तानिहाय बसावे किंवा नाही याबाबत निर्णय व नियोजन कोण करील ?</td><td>गटशिक्षणाधिकारी यांनी नेमलेले संबंधित परीक्षा केंद्राचे केंद्र संचालक (सर्व नियोजन परीक्षापूर्वी २ दिवस होणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>१२</td><td>मुलांसोबत कोणते साहित्य असावी?</td><td>निळ्या / काळ्या रंगाचा पेन, पाणी बाटली, पॅड</td></tr>
<tr><td>१३</td><td>परीक्षेसाठी पर्यवेक्षक / समवेक्षक</td><td>जि.प. शाळांमधील शिक्षक</td></tr>
<tr><td>१४</td><td>केंद्रस्तर परीक्षेसाठी केंद्रसंचालक</td><td>केंद्रप्रमुख / अनुभवी व सक्षम शिक्षक</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १५ | बीटस्तर परीक्षेसाठी केंद्रसंचालक | शिक्षण विस्तार अधिकारी / केंद्रप्रमुख / अनुभवी व सक्षम शिक्षक |
| १६ | तालुकास्तर परीक्षेसाठी केंद्रसंचालक | गटशिक्षणाधिकारी/ शिक्षण विस्तार अधिकारी |
| १७ | केंद्रस्तर, बीटस्तर व तालुकास्तर परीक्षेची व कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची संपूर्ण जबाबदारी कोणाची ? | स्वत: गटशिक्षणाधिकारी संबंधित तालुका |
| १८ | केंद्रस्तर, बीटस्तर व तालुकास्तर परीक्षेसाठी केंद्रसंचालकांची व पर्यवेक्षक, समवेक्षक, सहाय्यक व अन्य अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक कोण करील ? | स्वत: गटशिक्षणाधिकारी संबंधित तालुका |
| १९ | केंद्रस्तर, बीटस्तर व तालुकास्तर परीक्षेसाठी गोपनीय साहित्यांची ने-आण करण्याची संपूर्ण जबाबदारी | स्वत: गटशिक्षणाधिकारी संबंधित तालुका / नेमणूक केलेले अधिकारी/ कर्मचारी |
| २० | ग.शि.अ. यांना जिल्हास्तरावर गोपनीय साहित्य मिळणेची संभाव्य तारीख | दि. २८.११.२०२२ सोमवार (स्वत: ग.शि.अ. यांनी गोपनीय साहित्य घेऊन जाण्याची व्यवस्था करणे ) |
| २१ | गोपनीय साहित्य तपासून घेणे व परीक्षा केंद्रनिहाय प्रश्न पत्रिका कोडनिहाय लावून घेणे | दि. २९.११.२०२२ मंगळवार<br>(यासाठी केवळ ग.शि.अ. यांनी कार्यालयीन कर्मचारी घ्यावेत) |
| २२ | ग.शि.अ. यांनी परीक्षा केंद्र संचालकांना गोपनीय साहित्य देणे | दि. ३०.११.२०२२ रोजी सकाळी ८.०० वाजता |
| २३ | सर्व स्तरावरील परीक्षेची वेळ | सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजता (कोणत्याही परिस्थितीत वेळ बदलता येणार नाही) |
| २४ | परीक्षार्थीना परीक्षा कक्षात सोडण्याची वेळ | सकाळी १०.१५ वाजता ( एखादा विद्यार्थी उशीरा आला तर शहानिशा करुन याबाबतचा निर्णय केंद्र संचालकांनी घ्यावयाचा आहे मात्र कोणत्याही परिस्थितीत त्याला परीक्षेसाठीचा वेळ वाढवून मिळणार नाही ) |
| २५ | परीक्षार्थीकडे शाळेचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे का ? | होय. मात्र एखाद्या विद्यार्थ्याकडे शाळेचे ओळखपत्र नसेल तर संबंधित शाळेचे मुख्याध्यापक किंवा शिक्षक आपलाच विद्यार्थी आहे, याची खात्री करतील याची सर्व जबाबदारी त्या विद्यार्थ्यांशी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक व शिक्षकांची असेल. कोणत्याही परिस्थितीत फक्त जि.प.शाळांचे इ. ५ वी ते ७ वीचे विद्यार्थी परीक्षार्थी असतील याची खात्री करावी. |
| २६ | समवेक्षक / पर्यवेक्षक परीक्षा कक्षात / वर्गात जाण्याची वेळ | सकाळी १०.३० वाजता |
| २७ | परीक्षार्थीना प्रश्नपत्रिका-उत्तरपत्रिका (दोन्ही एकच) चे वाटप | सकाळी १०.३५ वाजता |
| २८ | प्रश्नपत्रिकेचे वाटप कसे करावे ? | विद्यार्थ्यांच्या स्वत:च्या शाळेच्या क्रमांकाप्रमाणे बैठक व्यवस्था केल्यावर ZIG ZAG पध्दतीने |
| २९ | परीक्षार्थीनी व समवेक्षकांनी सर्व माहिती भरणे | सकाळी १०.३५ ते १०.५५ वाजता |
| ३० | प्रश्नपत्रिकेवर जी उत्तरपत्रिकाही आहे त्यावर विद्यार्थ्यांनी काय लिहावे | विद्यार्थ्यांनी खालील ६ बाबी लिहिणे अतिमहत्त्वाचे आहे.<br>१.विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव<br>२.विद्यार्थ्याची स्वत:ची इयत्ता<br>३.विद्यार्थ्याचा स्वत:च्या शाळेतील हजेरी क्रमांक<br>४.विद्यार्थ्याच्या स्वत:च्या शाळेचे नाव<br>५.विद्यार्थ्याच्या स्वत:च्या केंद्राचे नाव<br>६.विद्यार्थ्यांची स्वत:ची स्वाक्षरी/ सही |
| ३१ | प्रश्नपत्रिकेवर जी उत्तरपत्रिकाही आहे त्यावर समवेक्षकांनी काय लिहावे? | १.स्वत:चे नाव<br>२.स्वाक्षरी / सही |
| ३२ | समवेक्षकाची महत्त्वपूर्ण जबाबदारी | विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिकेवर भरावयाच्या ६ बाबी अचूक भरल्या आहेत की नाही हे गांभीर्यपूर्वक पाहून नंतरच सही करणे अनिवार्य आहे. |
| ३३ | उत्तर पत्रिका वेगळी मिळणार का? | नाही, प्रश्नपत्रिकेवरच उत्तरे लिहिण्याची सोय आहे. पर्यायासमोर दिलेल्या चौकोनात √ (टिक मार्क) करावे. |

| | | |
|---|---|---|
| ३४ | उत्तर लिहिण्याची पध्दत | योग्य पर्यायाच्या समोरील छोटया चौकोनात काळ्या/ निळ्या शाईच्या पेनाने चौकोनात √ (टिक मार्क) करावे |
| ३५ | खाडाखोड किंवा एका प्रश्नाचे दोन ठिकाणी उत्तर लिहिले किंवा दोन ठिकाणी √ (टिक मार्क) केले तर काय होईल ? | संबंधित प्रश्नाला शून्य गुण मिळतील |
| ३६ | केंद्रस्तर, बीटस्तर प्रश्नपत्रिकेचे स्वरुप | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| ३७ | प्रश्नपत्रिका संच | A, B, C, D |
| ३८ | प्रश्नपत्रिकेचे माध्यम | मराठी आणि उर्दू |
| ३९ | केंद्रस्तर, बीटस्तर एकूण प्रश्न संख्या | ५० |
| ४० | तालुका स्तर प्रश्नपत्रिका स्वरुप | तालुका स्तरावर एक निबंध २० गुणांसाठी व ४० वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न ८० गुणांसाठी असतील. |
| ४१ | सर्वस्तर एकूण गुण | १०० |
| ४२ | प्रत्येक स्तरावरील प्रश्नपत्रिका सारखी आहे का? | नाही. केंद्र स्तर व बीटस्तर फक्त वस्तुनिष्ठ बहुपर्यायी ५० प्रश्न १०० गुणांसाठी असतील तर तालुका स्तरावर विज्ञान विषयाशी संबंधित ३ पैकी १ निबंध लिहायचा आहे. एका निबंधासाठी २० पैकी गुण तर ४० वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांसाठी ८० गुण असतील. |
| ४३ | जिल्हास्तरावरील निवडचाचणीचे स्वरुप | मुलाखत ५० गुणांसाठी तर सादरीकरण / प्रात्याक्षिक ५० गुणांसाठी |
| ४४ | जिल्हास्तरावरील निवडचाचणी कोण घेईल ? | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे सूचनेनुसार मुलाखतीसाठी एक टिम व सादरीकरण / प्रात्याक्षिकसाठी एक टिम असेल. |
| ४५ | प्रत्यक्ष प्रश्नपत्रिका सोडवण्याची वेळ | सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजता (कोणत्याही परिस्थितीत वेळ बदलता येणार नाही) |
| ४६ | केंद्रसंचालकांनी उपस्थिती व अनुपस्थिती अहवाल ग.शि.अ. यांचेकडे देण्याची वेळ | सकाळी ११.३० वाजता |
| ४७ | प्रश्नपत्रिका गोळा / परत घेणे | दुपारी १२.०० वाजता |
| ४८ | केंद्रसंचालकांनी प्रश्नपत्रिका मोजून परीक्षा केंद्रनिहाय गठ्ठा तयार करणे | दुपारी १२.३० वाजता |
| ४९ | केंद्र स्तरावरील गोपनीय साहित्य ग.शि.अ.यांच्या ताब्यात देण्याची वेळ | दुपारी २.०० वाजेपर्यंत |
| ५० | ग.शि.अ. यांनी गोपनीय साहित्य ताब्यात घेण्याची जास्तीत जास्त वेळ | दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ५१ | ग.शि.अ. यांनी केंद्रस्तरावरील प्रश्नपत्रिका मूल्यमापन सुरु करणे व पूर्ण करणे | दिनांक ३०.११.२०२२ रोजी सायं.४.०० पासून दि.१.१२.२०२२ रोजी दु.१२.०० पर्यंत |
| ५२ | प्रत्येक स्तरावरील परीक्षेचे मूल्यमापनाची जबाबदारी | स्वत: गटशिक्षणाधिकारी यांच्या देखरेखीत त्यांनी नेमलेले पुरेसे शिक्षक ज्यांचा संबंध संबंधित परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांशी नसावा |
| ५३ | ग.शि.अ.यांनी प्रश्नपत्रिका मूल्यमापन केल्यानंतरही फेरमूल्यमापन करणे | दिनांक १.१२.२०२२ दुपारी १२.०० ते सायं. ६.०० वाजेपर्यंत |
| ५४ | केंद्रस्तरावरील चाळणी परीक्षेचा निकाल | दिनांक २.१२.२०२२ |
| ५५ | सर्वस्तरावरील चाळणी परीक्षेचा निकाल कोठे पहावे? | रत्नागिरी जिल्हा परीषदेची अधिकृत संकेतस्थळ (Website) **www.zpratnagiri.gov.in आणि www.zpratnagiri.org.in** |
| ५६ | सर्वस्तरावरील चाळणी परीक्षेचा निकाल कोण जाहिर करील? | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे सूचनेनुसार प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी |
| ५७ | परीक्षार्थीना समान गुण पडल्यास | प्रत्येक स्तरावरच्या प्रश्नपत्रिकेतील पहिल्या २० प्रश्नांची उत्तरे तपासून ज्यांनी जास्त उत्तरे बरोबर आहेत ते पुढील स्तरावर जातील |
| ५८ | केंद्र स्तरावरुन किती मुले पुढे बीटस्तरावर जातील | १० मुले |

| | | |
|---|---|---|
| ५९ | एखादया केंद्रात जर ५ वी ते ७ वी मुलांची संख्या १० पेक्षा कमी असेल तर | जेवढी मुले परीक्षेला बसली तेवढी पुढे जातील मात्र १०० गुणांपैकी किमान ३५ आणि ३५ पेक्षा जास्त गुण असणे अनिवार्य आहे. |
| ६० | बीटस्तरावरील परीक्षेचे स्वरुप | सर्व बाबी केंद्रस्तरावरील परीक्षेप्रमाणे असतील |
| ६१ | बीटस्तरावरील परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे/उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन व निकाल | दिनांक ८.१२.२०२२ व ९.१२.२०२२ |
| ६२ | बीटस्तरावरुन किती विद्यार्थी पुढील स्तरावर जातील. | १० |
| ६३ | तालुकास्तरावरील परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे/उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन व निकाल | दिनांक ११.१२.२०२२ व १२.१२.२०२२ |
| ६४ | तालुका स्तरावरुन किती मुले जिल्हास्तरावर जातील? | १० ज्यामध्ये ३ मुली असणे अनिवार्य आहे. जर दोन किंवा एकाच मुलीची निवड झाली तर संपूर्ण तालुक्यातून मुलींमध्ये पहिल्या ३ मुलींना संधी देण्यात यावी. |
| ६५ | जिल्हास्तरावर किती मुलांची चाचणी होणार? | प्रत्येक तालुक्यातून १० असे ९ तालुक्यातून ९० विद्यार्थी जिल्हास्तरावर चाचणीसाठी येतील |
| ६६ | प्रत्येक तालुक्यातून इसरोसाठी किती मुलांची निवड होणार? | जिल्हास्तरावर प्रत्येक तालुक्यातून ३ मुलांची निवड ज्यामध्ये १ मुलगी असणे अनिवार्य आहे. निवड झालेल्या ३ मुलांमध्ये एकही मुलगी नसेल तर संबंधित तालुक्यातून आलेल्या १० पैकी कोणत्याही क्रमांकावर मात्र मुलींमध्ये प्रथम असलेली मुलगी लाभास पात्र असेल |
| ६७ | नासा भेटीसाठी प्रत्येक तालुक्यातून एक असे ९ लाभार्थी कोण ? | जिल्हास्तरावर प्रत्येक तालुक्यात निवड झालेला फक्त ७ वीचा एक विद्यार्थी (जर जिल्हास्तरावर संबंधित तालुक्यातून प्रथम आलेल्या ३ विद्यार्थ्यांमध्ये ७ वीचा विद्यार्थी नसेल तर पुढील चौथ्या क्रमांकापासून ते दहाव्या क्रमांकापर्यंत जो ७ वीचा विद्यार्थी प्रथम क्रमांकावर आहे तो लाभास पात्र असेल) |
| ६८ | प्रत्येक तालुक्यातून जिल्हास्तरावर निवडलेल्या ३ विद्यार्थ्यांना कोणते लाभ मिळणार ? | १.जिल्हास्तरावर प्रत्येक तालुक्यातून प्रथम आलेले ३ विद्यार्थी म्हणजेच ९ तालुक्यातून प्रथम आलेले २७ विद्यार्थी इसरो या भारतीय अंतराळ संशोधन संस्थेस व इतर ठिकाणी भेट देण्यास पात्र असतील. यामध्ये प्रत्येक तालुक्यातून किमान १ मुलगी असणे आवश्यक आहे.<br>२.जिल्हास्तरावरील परीक्षेत प्रत्येक तालुक्यातून प्रथम आलेला फक्त ७ वीचा १ विद्यार्थी असे एकूण ९ विद्यार्थी नासा या अमेरिकन अंतराळ संशोधन संस्थेस भेटीसाठी पात्र असतील. जर जिल्हास्तरावर संबंधित तालुक्यातून प्रथम आलेल्या ३ विद्यार्थ्यांमध्ये ७ वीचा विद्यार्थी नसेल तर पुढील चौथ्या क्रमांकापासून ते दहाव्या क्रमांकापर्यंत जो ७ वीचा विद्यार्थी आहे तो लाभास पात्र असेल. |
| ६९ | केंद्रस्तरावरील परीक्षेच्या दिवशी परीक्षा केंद्र भेटी कोण करणार आहेत ? | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशाने स्वत: मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व जिल्हास्तरीय खातेप्रमुख व वर्ग १ व वर्ग २ चे अधिकारी यांना तालुके व केंद्र नेमून दिलेले आहेत. |
| ७० | परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतीही अडचण आल्यास कोणास संपर्क करावा? | सर्वप्रथम संबंधित तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी यांचेशी संपर्क करावा व त्यानंतर गटशिक्षणाधिकारी जिल्हास्तरावरील खालील अधिकारी यांचेशी संपर्क करतील.<br>१.श्री. वामन जगदाळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद रत्नागिरी<br>भ्रमणध्वनी क्रमांक - ७०५७८५१५६३<br>२.श्री. सुधाकर मुरकुटे , उपशिक्षणाधिकारी , शिक्षण विभाग (प्राथमिक)<br>भ्रमणध्वनी क्रमांक - ७६२००००४५३<br>३.श्री.संदेश कडव, उपशिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक)<br>भ्रमणध्वनी क्रमांक- ७०२०४३१७३७ |

(श्री. सुधाकर मुरकुटे )
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद रत्नागिरी

**सही/-**
(श्री. वामन जगदाळे )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद रत्नागिरी